************ कलामंचचा मधुर आनेवाला पल *************

१९७० ते १९७५ या कळातिल अविट, सुमधुर गाण्यांनी नटलेला कलामंचचा मधुर "आनेवाला पल" ह्या कार्यक्रम मराठी विश्वच्या "मनोहर" सभागृहात नुकताच सादर झाला. भारतातील ऑटीस्टीक मुलांना मदत पुरवण्यासाठी "अखिल ऑटीसम फ़ाऊन्डशनने" हा सेवाभवी कार्यक्रम केला.

ह्या कार्यक्रमाचे वैशिष्ठ म्हणजे ही सर्व गाणी प्रतिभासंपन्न गीतकार गुलझार यांनी लिहिली होती तर त्यांच्या शब्दांना संगीताचा साज चढविला होता पंचमदा अर्थात आर. डी. बर्मन यांनी. गुलझार आणि आर. डी. या जोडगोळीने केलेली गाणी लोकांच्या हृदयाला स्पर्शुन चित्रपट संगीताच्या ईतिहासात अमर झाली. ह्यामधील अनेक गाण्यांना त्या त्या वर्षाचे फ़िल्मफ़ेर किंवा नेशनल अवार्ड ही मिळाले आहेत.

अशी ही प्रसिद्ध, अजरामर गाणी घेऊन आपल्यापुढे आले ते गोड गळ्याचे कलामंचचे गुणी कलाकार.

कार्यक्रमाची सुरुवात ठिक चार वाजता पंडीत माधव भाटकी यांच्या हसते दीप प्रज्वलनाने झाली। महेश लाडांनी नंतर गणेश वंदन म्हणून कार्यक्रमाचा शुभारंभ केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालक होते अष्टपैलू सचिन राजे. स्वतः उत्तम गायक आणि वादक असलेले सचिन आज निवेदकाची भूमिका छान पार पाडित होते. सर्वप्रथम तुषार जांभेकरांनी "परिचय" ह्या १९७२ च्या हिट चित्रपटातील हिट गाणं "मुसाफ़ीर हू यारो" म्हटले। तुषार हे हौशी गायक असून गाण्यांच्या विविध स्पर्धेत किंवा कार्यक्रमात ते सतत भाग घेत असतात. रुचा जांभेकर यांनी त्यानंतर "इजाजत" सिनेमातील "मेरा कुछ सामान लौटा दो" असे सुरेख शब्द असलेली गज़ल सादर केली. शास्त्रीय संगीतात पारंगत असलेल्या रुचाने वेगवेगळी गाणी नामवंत गायकांबरोबर गायली आहेत। आशाबाईनी गायलेली ही अप्रतिम

गज़ल ताकदीने म्हणून रुचाने रसिक प्रेक्षकांची दाद मिळवली. १९७५ मध्ये आलेला "आंधी" सिनेमा अनेक कारणांमुळे जरी गाजला असला तरी त्यातील गाणी अविट गोडीची आहेत हेही तितकच खर. याच चित्रपटातील "इस मोडसे जाते है" हे द्वंद्वगीत सादर केले ते प्रज्ञा जाधव आणि तुषार जांभेकरांनी. फिरत्या गळ्याचे वरदान लाभलेल्या प्रज्ञानी लहानपणापासुनच शास्त्रीय संगीताचे धडे गिरवले आहेत। याशिवाय प्रापंचिक व्याप सांभाळून त्या गाण्याचे विविध कार्यक्रम करतात.

लताबाईची ऊंच स्वरातील गाणी गाणे हे कठीण खरेच पण ते अगदी सहजसाध्य करून दाखविले रुचाने। त्यांनी "जहां पे बसेरा हो" हे गाणे अगदी लिलया म्हटले.

"घर" सिनेमातील "तेरे बिना" हे गीत त्यानंतर प्रज्ञाने सादर केले.

महेश लाड त्यानंतर आपल्यापुढे "ओ माझी रे" हे "खुशबू" सिनेमातील गाणे घेऊन आले. महेशच्या घराण्यातच गाण्याची परंपरा आहे आणि आनंदी वृतीच्या महेशनी ही गायकी पुढे चालू ठेवली आहे. महेश प्रासंगिक विनोद करुन नेहमीच वातावरण प्रफुल्लित ठेवतात.

नंतर विनोदी वृतीशी जवळीक साधणारं "प्रितम आन मिलो" हे "अंगूर" सिनेमातील गीत महेशनी सादर केले.

"हुजूर इस कदर भी" ही काहिशी वेगळी गज़ल म्हटली महेश आणि तुषार ने.

मध्यंतरपुर्वीची शेवट्ची गज़ल घेऊन आली रुचा. ही गज़ल जरी गुलझार आणि आर. डी. जोडीची असली तरी कोणत्याही सिनेमातील नव्हती. "दिल पडोसी है" या नावच्या काहीश्या अप्रसिद्ध अल्बम मधील हि अनोखी गज़ल वगळाच ठसा उमटून गेली.

मध्यांतरात खानपान उरकल्यानंतर सर्वप्रथम मनिषा लाड यांनी "अखिल ऑटीसम फ़ाऊन्डेशन" संस्थेची माहिती सांगणारं प्रेसेन्टेशन केले. अखिल हा मनिषा महेश या हौशी दांपत्याचा एकुलता एक मुलगा. तो ऑटीस्टिक

असल्याचे निदान झाल्यानंतरही या मानसिक आघाताने खचून न जाता महेश मनिषाने उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या पद्धतीचे उपचार करून अखिलला प्रगतीचा मार्ग दाखविला. एवढेच नव्हे तर अखिल प्रमाणेच भारतातील ऑटीस्टिक मुलांनाही सर्व प्रकारच्या उपचारपद्धती सुलभरित्या मिळाव्यात यासाठी "अखिल ऑटीसम फ़ाऊन्डेशन" ही संस्था स्थापन केली. मनोरंजनाचे विविध कार्यक्रम करून ही संस्था भारतातील ऑटीस्टिक मुलांच्या मदतीकरता निधी जमवेल. अधिक माहितीसाठी कृपया वेबेसाईट पहा. www.akhilautismfoundation.org

उत्तम गायकाला जर उत्तम वादकांची साथसंगत लाभली तर ऐकणार्या प्रेक्षकांसाठी तो एक अविस्मरणीय कार्यक्रम ठरतो. "आनेवाला पल" मधील गायक कलाकरांना असेच गुणी वादक लाभले आणि कार्यक्रमाची गोडी अवर्णनीय ठरली.

कलामंचच्या वादकांची ओळख करून दिली निवेदक सचिन ने. किबोर्डवर राज बांदेकर आणी प्रशांत गिजरे होते. या दोघांनीही सुरेश वाडकर, रविंद्र साठे अश्या अनेक मान्यवर कलाकरांना साथ केली आहे. याशिवाय प्रशांत गिटार वाजवतात आणि उत्तम गातात. तबल्यावर होते अनुभवी विक्रांत केळकर आणि लहान वयातच उत्कृष्ठ तबला वाजविणारे राहूल वेंकटरामन. गिटारवर निलेश मिस्त्री आणि देवेन पानसे हे गुणी आणि हौशी तरुण होते. प्रफ़ुल मेस्त्री यांनी साऊंड ईजीनियरची जवाबदारी पार पाडली.

यानंतर कार्यक्रमाची सुरुवात महेश ने मासूम चित्रपटातील "तुझसे नाराज़ नही जिंदगी" या गाण्याने झाली. मनापासून गायलेल्या महेशच्या या हृदयस्पर्शी गाण्याने भावनाप्रधान प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेतला. त्यानंतर तुषारचे "आनेवाला पल" हे कार्यक्रमाचे शीर्षक गीत झाले. त्यानंतर महेश ने प्रज्ञाबरोबर "बिती ना बितायी रैना" आणि रुचा बरोबर "नाम गुम जायेगा" ही सुरेख गाणी सादर केली.

हरजाई सिनेमामधील लतादिदींच कहीस हळुवार "तेरे लिये पलकोंकी" हे गाणे प्रज्ञाने म्हटले तर तुषार रुचाने "घर" सिनेमातील "आपकी आंखोमे" हे युगलगीत म्हटले.

आर. डी. बर्मन च्या कार्यक्रमात खुद्द आर. डी. ने म्हटलेली गाणी हवीतच. महेश आणि आर. डी. च्या आवजात प्रशांत गिजरे या दोघांनी "गोलमालचे" टयटल सौंग म्हटले.

बरेचदा पाष्चिमात्य गाण्यांसारखी गाणी करणार्या आर. डी. चा भारतीय शास्त्रीय संगीताचा ही अभ्यास होत हे सिद्ध करणार "खूबसूरत" मधलं "पिया बावरी", प्रज्ञा आणि महेशने अशा ताकदीने पेश केलं की प्रेक्षकांनी "वन्समोरच्या" गजराने सभागृह डोक्यावर घेतलं.

महेशने यानंतर आभारप्रदर्शन केले. सर्व गायक, वादक, निवेदक आणि कार्यक्रमासाठी उत्स्फुर्तपणे राबणारे स्व्यंसेवकांचे त्याने मनापासुन आभार मानले. प्रेक्षकांच्या सहभागाची जाणीव ठेऊन त्याने प्रेक्षकांविषयी ही कृतज्ञता व्यक्त केली.

आर. डी. व गुलज़ारच वेगळाच ठसा उमटणारे "धन्नो की आखों मे" हे आर. डी. च्या आवजात हुबेहुब गाऊन प्रशांतने ही दोन तास रंगलेली सुंदर मैफ़ील संपविली.

- सुनीता चौधरी